**<u>विशेष दिवाणी दावा क्र. ३६/२०२३ मधील निशाणी क्र. ४१ वरील आदेश</u>**
**( रविंद्र शिवाजी फोकणे विरुध्द शिवाजी फोकणे व इतर)**
**सीएनआर नं. एमएचएनएस२९००१२५२—२०२३**

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आज्ञवली ६ नियम १७ प्रमाणे दाव्यांच्या कथनामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

**<u>०२.</u>** अर्ज व प्रतिवादी क्र. ५ चे नि. ४५ वरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

**<u>०३.</u>** वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुद्ध वाटप, घोषणा व निरंतर ताकीदीकामी दाखल केला आहे. वादीस दावा दाखल झालेनंतर समजले की त्याचेकडुन अनावधानाने मौजे घोटी खुर्द येथील वडीलोपार्जीत शेतमिळकत ग.क्र. १५५ ही मिळकत दाव्याद नमूद करावयाची राहुन गेली आहे. त्यामळे वादीस दावा कलम मिळकतीचे वर्णनात अ.क्र. ५ मधील मजकूर समाविष्ट करुन दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.

**<u>०४.</u>** वादीने प्रस्तुत अर्जात नमूद केलेली प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्यामध्ये सर्व मिळकतीत सामील करणेचे दृष्टिने आवश्यक व गरजेचे आहे. इतर दावा मिळकतीस संदर्भात प्रतिवादी क्र. ५ सोबत असलेले गहाणखत व त्याकरीता प्रलंबित असलेले कर्ज वसुली प्रकरण याचा सदर दावा दुरुस्तीच्या अर्जावर कोणताही परीणाम होत नाही. वादाच्या अंतिम निराकरणाच्या दृष्टिने सर्व मिळकती एकाच दाव्यामध्ये सामील असणे आवश्यक व गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर होणे न्यायोचित आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते:

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी आज किंवा कायदेशिर मुदतीमध्ये प्रस्तावित दुरुस्ती करुन घ्यावी व दाव्याची दुरुस्त प्रत सादर करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

NANAWARE MOHINI DATTATRAY
Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2026.08.12 15:18:50 +0530

स्थळ:— इगतपुरी ( मो. द. ननवरे )
दिनांक:— १२/०८/२०२६ दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, इगतपुरी.

मी अशी खात्री देते की, पीडीएफ नस्तीमधील निकालपत्रातील प्रत्येक शब्द हा मुळनिकालपत्रातील मजकुराशी जुळणारा व सुसंगत आहे.

लघुलेखकाचे नांव : श्रीमती व्ही.आर.बलकवडे

न्यायालयाचे नांव : दिवाणी न्यायाधिश व.स्तर, इगतपुरी.

निकालाचा दिनांक :१२/०८/२०२६

निकालपत्रावर पिठासन अधिका—यांनी सही केल्याचा दिनांक : १२/०८/२०२६

निकालपत्र अपलोड केल्याचा दिनांक : १२/०८/२०२६